# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त, मिरा भाईंदर महापालिकेमार्फत भव्य ग्रंथ दिंडी आणि प्रदर्शनाचे आयोजन**

**मिरा-भाईंदर, २३ जानेवारी २०२५:** मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत गुरुवार दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी भव्य ग्रंथ दिंडी आणि ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांनी ग्रंथ दिंडीचा शुभारंभ केला आणि ग्रंथ दिंडी खांद्यावर घेऊन, सहभागी झाले. या दिंडीत सर्व महापालिकेचे कर्मचारी पारंपारिक वेशभूषेत, मराठी भाषेच्या प्रचारार्थ घोषवाक्ये फलक घेऊन सामील झाले. लेझीम, ढोल या पारंपरिक वाद्यांच्या गजरात ही दिंडी महापालिका मुख्यालय ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनपर्यंत (नगरभवन) काढण्यात आली होती.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा केला जातो. या कालावधीत मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आणि तिचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच मराठी भाषेचे वैभव जपणे, मराठी भाषेचे संवर्धन करणे, मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करणे हे यामागील उद्दीष्ट आहे. हेच उद्दीष्ट घेऊन मिरा भाईंदर महानगरपालिकेने भव्य ग्रंथ दिंडी आणि ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मराठी भाषेच्या प्रचारार्थ, दिंडीचे आयोजन केले होते. यासाठी महापालिकेचे प्रवेशद्वार सजवून, तेथे रांगोळी काढण्यात आली होती. महापालिकेचे सर्व कर्मचारी उत्स्पुर्तपणे मराठमोळ्या पारंपरिक वेशभूषा परिधान करून आले होते. या ग्रंथ दिंडीमार्फत मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार व्हावा, यासाठी मराठी भाषेचे महत्त्व सांगणारे, गौरव करणारी घोषवाक्ये लिहिलेली फलके घेऊन कर्मचारी दिंडीत सहभागी झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनमध्ये ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले आहे. यावेळी या प्रदर्शनाचे अनावरण ग्रंथालय प्रमुख आणि ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात आले. या प्रदर्शनात दुर्मिळ ग्रंथ, साहित्यिक पुस्तके, माहितीजन्य पुस्तके आदीं पुस्तके आहेत. यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांनी 'मराठी भाषा टिकली तर मराठी संस्कृती टिकेल' असे उद्बोधन केले. त्याचबरोबर मराठी आपली मातृभाषा व ज्ञानभाषा आहे. तीचे महत्त्व टिकवुन ठेवण्याचे आवाहन आपल्या पिढी पुढे आहे. तसेच त्यांनी मिरा भाईंदरच्या नागरिकांना प्रदर्शनातील साहित्याचा, वाचनाचा आनंद घेण्याचे आवाहन केले आहे.

ग्रंथ दिंडी आणि प्रदर्शनास, अतिरिक्त आयुक्त श्री संभाजी पानपट्टे, उपायुक्त मुख्यालय श्रीमती कल्पिता पिंपळे, उपायुक्त संजय बांगर, उपायुक्त श्री प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दीपक खांबित तसेच मनपा अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.